# ‘गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती’

**तर मंडळी,**




आपल्या गावात ‘गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती’ तयार झाली असेलच. आपल्या गावाचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी, गावाचं आरोग्य नियोजन करण्यासाठी आपल्या सर्वांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. पण आपल्याला गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कामकाजाविषयी, समितीच्या अधिकारा विषयीच जर काही माहिती नसेल तर आपण आपल्या गावाचं आरोग्य नियोजन कसं करू शकणार? ...म्हणूनच आपण सर्वांनी या समितीविषयी सविस्तर माहिती करून घ्यायला हवी.

चला तर मग, आपण गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची रचना, कार्यपद्धती, अधिकार व जबाबदारी समजून घेऊयात!

***‘गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती’* असे या समितीचे नाव असून या समितीची रचना पुढील प्रकारे असते.**

## गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना

गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता या समितीत ग्रामपंचायतीचे सदस्य, आशा, अंगणवाडीताई, नर्सबाई (ए.एन.एम.) व बचतगट प्रमुख असतील.

याबरोबरच पालक-शिक्षक संघटनेचे सचिव, बचत गट व तरुण मंडळांचे प्रतिनिधी, गावात हक्कासाठी काम करणाऱ्या संस्थेने सुचवलेले लोकं व सामान्य नागरिकांपैकी काही लोकं हे पण समितीचे मेंबर असतील.

### कार्यकारी मंडळ

**अध्यक्ष-** ग्रा. पं. सदस्य (महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीच्या सदस्यांना प्राधान्य)

**सचिव-** आशा

**निमंत्रक-** स्वयंसेवी संस्थेचे/संघटनेचे प्रतिनिधी

**या समितीमध्ये ५०% स्त्रियांचा सहभाग असावा.**

**या समितीच्या नावे गावाच्या लोकसंख्येनुसार सरपंच व अंगणवाडी कार्यकर्ती यांच्या संयुक्त खात्यावर निधी जमा होतो.**

# आरोग्यसेवांवर देखरेख व नियोजनासाठी 'गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती'ची
# कामे व जबाबदारी

## गाव बैठक

गावात आरोग्याचे प्रश्न कोणते आहेत यासाठी लोकांसोबत समितीने चर्चा करावी. गावातील सर्व लोक सहभागी व्हावेत म्हणून दलित, गरीब, स्त्रिया, तरुण वर्ग यांच्यासोबत छोट्या गटांमध्ये बैठक घ्यावी. त्यानंतर गावात मोठी बैठक घ्यावी. या बैठकीमध्ये खालील मुद्यांवर चर्चा करावी.

१. गावातील आरोग्याचे प्रश्न जाणून घेणे व गाव आरोग्य योजनेबद्दल चर्चा करून योजना तयार करणे.

२. आरोग्य हे मुळात पाणी, आहार, निवारा व परिसर यांसारख्या घटकांवर अवलंबून असते. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला या गोष्टी मिळण्याचा हक्क आहे. याची जाणीव लोकांना करून देणे. कुपोषण, गंभीर आजारी व्यक्ती, गावासाठी असलेले रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था हे प्रश्न आपण कशाप्रकारे सोडवू शकतो यावर विचार करणे. कोणत्याही कारणामुळे आजारपण वाढले असेल तर या समस्या व्यक्तिगत आहेत का? अर्थातच नाही. म्हणूनच या समस्यांवर एकत्र येऊन चर्चा करून योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे.

३. या अनेक घटकांपैकी आरोग्यसेवा हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी गावात मिळणाऱ्या आरोग्यसेवा व गावासाठी अपेक्षित आरोग्य कार्यक्रमांबद्दल माहिती देणे. मुख्य म्हणजे सरकारी आरोग्यसेवा या आपल्या हक्काच्या आहेत याची माहिती लोकांना देणे. ज्यामुळे गावात नियमित आरोग्यसेवेची मागणी करण्यासाठी लोकांना बळ येईल.

गावात नियमितपणे आरोग्याच्या सेवा मिळतात का याचा शोध घेण्यासाठी लोकांच्या मदतीने गावातच पाहणी केली जाईल. गावामध्ये मिळणाऱ्या आरोग्यसेवांवरील देखरेखीसाठी वर्षातून साधारणपणे दोन वेळा खालील माध्यमांतून माहिती गोळा करावी.

## गटचर्चा


गावात जर विभाग किंवा जातीनुसार गट असल्यास (खुला, वंचित, वस्ती/पाडा) त्यानुसार वेगवेगळी गटचर्चा घ्यावी.

## मुलाखत

आरोग्य समितीने गावपातळीवर मिळणाऱ्या आरोग्यसेवांवर देखरेख करण्यासाठी आपल्या गावातल्या काही व्यक्तींच्या मुलाखती घ्याव्यात. यामध्ये मुख्यतः आरोग्यसेवा घेताना, रुग्णांना येणारे अनुभव पुढील मुद्द्यांवर आधारित असावेत. औषधोपचार, वागणूक आणि जननी सुरक्षा योजने अंतर्गत मिळणारे पैसे इ.

## प्रगती पत्रक

गाव आरोग्य समितीने गटचर्चा, मुलाखत व पाहणी या माध्यमातून मिळालेली माहिती ‘गाव आरोग्य प्रगतीपत्रका’मधून सर्वांसाठी जाहीर करावी. यामध्ये आपल्या गावातील प्रत्येक आरोग्यसेवेची स्थिती **चांगली परिस्थिती- हिरवा रंग, काहीशी समाधानकारक परिस्थिती- पिवळा रंग आणि गंभीर परिस्थिती- लाल रंग** अशा तीन भागात वर्गीकरण करून रंग भरावे.


राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यासाठी लोकाधारित कृती (CAH प्रक्रिया)
आपल्या गावातील आरोग्यसेवांचे प्रगतीपत्रक
चला आपल्या आरोग्य सेवांवर देखरेख ठेवू! आपल्या आरोग्य सेवांचे नियोजन करू!

गावाचे नाव - ____________ दिनांक -

गावासाठी आरोग्य सेवक (एम.पी.डब्ल्यू.) आहे-☐ नाही-☐ गावासाठी आरोग्य सेविका (ए.एन.एम.) आहे-☐ नाही-☐


गावापासून उपकेंद्राचे अंतर ----- कि.मी. गावापासून प्रा.आ.केंद्राचे अंतर ------ कि.मी.

सूचना- कृपया आरोग्यसेवांची सद्य:स्थिती या रकान्यात पुढील मुद्यांच्या परिस्थितीनुसार रंग भरावे.
•चांगली परिस्थिती (हिरवा रंग) •काहीशी समाधानकारक परिस्थिती (पिवळा रंग) •गंभीर परिस्थिती (लाल रंग)

| | | आरोग्य सेवांची सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १) गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या कामासंदर्भातील माहिती | | |
| २) साथीच्या आजारांवर गावात केल्या जाणाऱ्या उपाय योजना | | |
| ३) गावात मिळणारा औषधोपचार | | |
| ४) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम | | |
| ५) ‘आशा’च्या कामाची परिस्थिती | | |
| ६) अ) मातामृत्यू | | |
| ब) बालमृत्यू | | |

वरील प्रगतीपत्रकामध्ये उदाहरणादाखल काही सेवा दिल्या आहेत.


## कॅलेंडर कार्यक्रम




आपल्या गावातील आरोग्यसेवांचा दर्जा सुधारण्यासाठी व या सेवा योग्य रितीने, नियमित मिळण्यासाठी बऱ्याच ठिकाणी ‘गाव आरोग्य कॅलेंडर’ हा कार्यक्रम राबवण्यात आला आहे. आपल्या गावातही आपण हा कॅलेंडर कार्यक्रम राबवू शकता.

**गाव आरोग्य कॅलेंडर-** आशा, नर्सबाई व एम.पी.डब्ल्यू. यांच्याकडून गावात आरोग्यसेवा मिळतात. साध्या आजारांवर उपचार, नियमितपणे लसीकरण, गरोदर स्त्रियांना सल्ला देणे, विशिष्ट आजारांचा पाठपुरावा, पाण्याचे निर्जंतुकीकरण इ. सेवा देणे अपेक्षित आहे. बहुतेक वेळा आपल्याला या

सेवकांची कामे माहीत नसतात किंवा माहीत असली तरी ते कोणत्या दिवशी गावात येतात हे समजू शकत नाही. यावर उपाय म्हणून गावातील लोक या सेवकांच्या कामांवर आरोग्यसेवा कॅलेंडरद्वारे देखरेख ठेवू शकतात व त्यांना सहकार्य करू शकतात. हे कॅलेंडर गावात चावडी, ग्रामपंचायत कार्यालय, रेशन दुकान इ. अशा सार्वजनिक ठिकाणी लावावे ज्यामुळे त्यावर नोंदवलेली कामे सर्वांना कळतील. न झालेल्या कामाची चर्चा करावी व नियमित सेवा मिळतील यासाठी प्रयत्न करावा.



- गावात बैठक आयोजित करावी. या बैठकीत आशा, नर्सबाई, एम.पी.डब्ल्यू. (मलेरिया डॉक्टर), अंगणवाडी ताई आणि गावकरी असावेत. या सर्व आरोग्यसेवा देणाऱ्या व्यक्तींच्या कामात गावकरी त्यांना मदत करतील ही खात्री या बैठकीतून मिळायला पाहिजे.
- आरोग्य कर्मचाऱ्यांच्या महिन्यातून किती गावभेटी होतात? कोणत्या गावभेटीत कोणते काम प्रामुख्याने अपेक्षित असते? गावकऱ्यांना त्यांच्याकडून कोणत्या सहकार्याची अपेक्षा आहे? आरोग्य सेवकांना कोणत्या कामात गावकऱ्यांची मदत मिळू शकते? साधारणतः या मुद्दयांवर चर्चा करावी.
- यानंतर प्रा.आ. केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांच्यासोबत गाव आरोग्य समितीने कॅलेंडर कार्यक्रम राबविण्याविषयी बैठक घ्यावी.
- गावात आरोग्यसेवा देणाऱ्या व्यक्ती कधी येणार ते कॅलेंडरवर लिहावे. काम न झाल्यास त्या निश्चित तारखेवर फुलीचे चिन्ह (x) गावकरी करतील. यामुळे कोणते काम झाले नाही, काय अडचण होती याची नोंद गावात सर्वांसाठी उपलब्ध होईल. तसेच कोणत्या दिवशी कोणती सेवा मिळणार हे आधीच समजल्याने गरोदर बायका, आजारी माणसे ठरल्याप्रमाणे गावात एका ठिकाणी सेवा घेतील.

**जी. आर. मध्ये लिहिल्याप्रमाणे या समितीसाठी आर्थिक तरतूद पुढीलप्रमाणे-**

या निधीचा उपयोग कसा करायचा ते पुढे स्पष्ट दिलंय...

- गावातील आरोग्याच्या परिस्थितीचा अंदाज येण्यासाठी गावातील सर्व घरांची माहिती गोळा करणे. ज्यामुळे गावासाठी आरोग्य कार्यक्रम आखण्यास मदत होईल.
- गावकऱ्यांना आरोग्याची माहिती देण्यासाठी शिबिरं / मेळावे असे कार्यक्रम घ्यावेत.

| गाव समितीला मिळणारा अबंधित निधी | |
|---|---|
| गावाची लोकसंख्या | गावाला मिळणारा निधी (रु.) |
| ०-५०० | ५,०००/ |
| ५०१-१५०० | ८,०००/ |
| १५०१-५००० | १५,०००/ |
| ५००१-१०००० | २४,०००/ |
| १०००१ च्या पुढे | ३०,०००/ |

- गरजू गावकऱ्यांच्या आजारपणात तात्पुरती आर्थिक मदत करणे व त्या गावकऱ्याला जमेल तसं त्या पैशाची परतफेड करण्यास सांगणे. (रिव्हॉल्विंग फंड)
- गाव स्वच्छ राहावं म्हणून गावातला परिसर स्वच्छ ठेवणे, खड्डे बुजवणे, सांडपाण्याची योग्य व्यवस्था लावावी.



- कोणत्याही अपघातानंतर तसेच बाळंतपणाच्या वेळी किंवा गंभीर आजारी व्यक्तीला दवाखान्यात पोचवण्यासाठीचा खर्च या निधीतून करता येईल.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यासाठी लोकाधारित कृती प्रक्रियेअंतर्गत संस्थांच्या मदतीने गाव आरोग्य समित्या नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत.**

१. गाव आरोग्य दिवस साजरा करणे.

२. गावसमितीमध्ये किशोरवयीन मुला-मुलींचे प्रतिनिधी असणे.

३. आरोग्य, पाणी आणि अंगणवाडी यांवर देखरेख करण्यासाठी गाव आरोग्य समितीमधून दोन व्यक्तींची उपसमिती तयार करणे.



४. बॅनर्सच्या माध्यमातून आपल्या गावाच्या आरोग्यसेवेचे रिपोर्ट कार्ड जाहीर करणे.

५. गाव आरोग्य कॅलेंडर कार्यक्रम राबविणे

६. गावात आरोग्य तपासणी शिबिर व पौष्टिक आहाराविषयक मेळावा घेणे.

# ‘गाव आरोग्य, पोषण व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यां’चे अधिकार

**गावकऱ्यांना आरोग्यसेवांची माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून पुढील गोष्टी कराव्यात...**

- गावात आरोग्य रजिस्टर ठेवणे.
- आरोग्य कार्यक्रमांची माहिती लिहिण्यासाठी सूचना फलक/फळा लावणे.
- नर्सबाई, मलेरिया डॉक्टर यांच्या गावभेटी नियमित होण्यासाठी, त्यांची ठरलेली कामे करतात का यासाठी गावात आरोग्य कॅलेंडर लावणे.
- गरोदर स्त्रिया, नवजात मुले, लहान मुले यांची तपासणी व साध्या आजारी व्यक्तींना गावात सेवा कुठे, कधी व कोणत्या वेळी मिळतील याची माहिती गावकऱ्यांना कळवणे.
- गावात मिळालेल्या आरोग्यसेवांची माहिती सार्वजनिकरित्या जाहीर करणे. अपेक्षित असलेल्या परंतु सध्या न मिळणाऱ्या आरोग्यसेवा मिळण्यासाठी प्रयत्न करणे.
- गावासाठी मिळणाऱ्या मुक्त म्हणजेच अबंधित निधी (Untied Fund) वर लक्ष ठेवणे. या निधीच्या वापरासंबंधी आवश्यक त्या सूचना देणे व वापर केलेल्या निधीच्या जमाखर्चाची पडताळणी करणे.
- कॅलेंडर कार्यक्रमामध्ये ठरल्याप्रमाणे नर्सबाई आणि एम.पी.डब्ल्यू. गावभेटी देतील व ठरलेली कामे पार पाडतील यांवर लक्ष ठेवणे.
- आरोग्य कर्मचाऱ्यांनी गावभेटींदरम्यान गावात दिलेल्या सेवांचा महिन्यातून एकदा अहवाल घेणे. सादर केलेल्या अहवालावर चर्चा करून योग्य कार्यवाही करणे.
- अंगणवाडीला भेट देऊन मुलांना मिळणाऱ्या आहाराचा दर्जा तपासणे व कुपोषित मुलांचे वजन घेऊन अंगणवाडी सेविकेकडच्या रजिस्टरमध्ये असलेल्या नोंदींची पडताळणी करणे.




## चला तर मग आत्तापासून आपल्या आरोग्य हक्कासाठी आपण सर्वजण एकत्र येऊन काम करूयात!

**आपल्याही गावात लोकांना आरोग्यसेवेचा हक्क मिळवण्यासाठी व ‘गाव आरोग्य समिती’साठी आलेल्या निधीचे योग्य नियोजन व वापर करण्यासाठी सहभागी होऊया!**

# ‘गाव आरोग्य, पोषण व पाणी पुरवठा व स्वच्छता समिती’चा
# जीआर

ग्रामस्तरावरील “ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता” व “ग्राम आरोग्य समिती” यांचे विलिनीकरण करून या विषयांसाठी ग्रामस्तरावर “ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती” अशी एकच समिती गठित करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु.१००६/प्र.क.३६९/पापु-०७
मंत्रालय, मुबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर, २००६

पहा. - (१) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्र.ग्रापापु.१०९१/सीआर२६७/३९-अ, दिनांक १०.०९.१९९१
(२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु.१०९६/प्र.क्र.१२८०/पापु-०७, दिनांक २८.११.१९९६
(३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संकीर्ण २०००/प्र. क्र.२६१/कु.क.३, दिनांक १०.११.२०००
(४) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु.१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३-९-२००१
(५) दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रसिध्द केलेल्या सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३
(६) शासन परिपत्रक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु. १००५/प्र.क्र.७४(२) पापु-०७, दिनांक २.५.२००५

**प्रस्तावना :**

१. गावातील पाणीपुरवठा योजनांच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम पाहण्यासाठी व पाणी गुणवत्ता नियत्रंणासाठी ग्रामस्तरावर ग्राम पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता समिती गठित करण्याबाबत सूचना संदर्भाधिन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये उक्त शासन निर्णयात देण्यात आली आहेत.

२. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी सन २००० मध्ये मागणी आधारित समूह सहभागाचे सुधारित धोरण जाहीर केल्यानंतर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयात दिलेल्या सूचनांव्ये पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी ग्रामस्तरावरून करण्यासाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये त्यात नमूद करण्यात आलेली आहेत.

३. मुबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारित कलम ४९ मध्ये अंतर्भूत करून ग्रामस्तरावर गठित होणाया ग्रामविकास समित्यांना वैधानिक दर्जा देण्यात आला असून ग्रामस्तरावरील विविध विकास कामांसाठी ग्रामविकास समित्या गठित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

४. केद्र शासनाने सन २००५ पासून सुरू केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (National Rural Health Mission) (NRHM) कार्यक्रमांतर्गत बालमृत्यू दर, मातामुत्यृ दर व जनन दर कमी करणे, लसीकरण, कुपोषण व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक बालविकास प्रकल्प व इतर कुटुंब कल्याणविषयक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

५. ग्रामीण जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे, कुपोषण व आरोग्यविषयक कार्यक्रम हे एकमेकांशी निगडित असल्याने ग्रामस्तरावरून त्यांची अंमलबजावणी करताना या विविध कार्यक्रमांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याने या कामांसाठी ग्रामस्तरावर वेगवेगळ्या समित्या गठित न करता हे काम ग्रामस्तरावरील एकाच समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याने ग्रामस्तरावरील ग्राम आरोग्य समितीचे विलिनीकरण ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करून या समितीचे नामाभिधान ‘ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती’ असे करण्याची व ग्रामीण पाणीपुरवठा,

स्वच्छता, आरोग्य व पोषण हे विषय या समितीच्या अखत्यारित आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

१. प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून ग्रामस्तरावरून राबविण्यात येणारा पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कार्यक्रम, आरोग्य विषयक कार्यक्रम तसेच महिला व बालविकास कार्यक्रम ग्रामस्तरावरील एकाच समितीमार्फत राबविण्यासाठी ग्रामस्तरावरील ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम आरोग्य समिती यांचे विलीनीकरण करून, मुबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ अन्वये 'ग्राम आरोग्य, पोषण, पुरवठा व स्वच्छता समिती' अशी एकच समिती गठित करण्यास व या समितीमार्फत पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कार्यक्रम, आरोग्यविषयक कार्यक्रम तसेच महिला व बालविकास कार्यक्रम राबविण्यात शासन मान्यता देत आहे.

२. 'ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची' रचना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ नुसार राहील (प्रत सोबत परिशिष्ट १ मध्ये जोडली आहे.) तर, या समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद आल्यानुसार राहतील.

३. वरील प्रमाणे 'ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती' गठित करण्यात आल्यावर या समितीचे सध्या असलेले बँक खाते फक्त पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी वापरात ठेवावे; तर आरोग्य, महिला व बालविकास कार्यक्रमासाठी स्वतंत्र बचत बँक खाते उघडण्यात यावे. हे स्वतंत्र बचत बँक खाते समितीचे अध्यक्ष व गावातील अंगणवाडी सेविका या दोघांच्या संयुक्त सहीने चालविण्यात यावे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत व आरोग्य तसेच पोषण कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणारा निधी या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्यात यावा. या खात्यामधील जमाखर्चाची नोंद आशा/अंगणवाडी सेविका यांनी स्वतंत्र नोंदवहीद्वारे ठेवावी. जमाखर्चाची नोंदवही वेळोवळी एएनएम/एमपीडब्ल्यू/ग्रामपंचायतीने तपासावी व सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध ठेवावी. या निधीचा विनियोग करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या/येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१२०६१२३२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.शं. धुमाळ)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री याचे खाजगी सचिव (सर्व)
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. सदस्य, महाराष्ट्र विधानसभा/महाराष्ट्र विधानपरिषद (सर्व)
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मत्रांलय, मुंबई (दोन प्रती)

**प्रकाशक- साथी (Support for Advocacy & Training to Health Initiatives)**
(राज्य समन्वयक संस्था, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यासाठी लोकाधारित कृती (CAH प्रक्रिया) महाराष्ट्र राज्य)
अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड,
पुणे-४११०२९; फोन- (०२०) ६५००६०६६, २५४५२३२५
E-mail : sathicehat@gmail.com, sathicbmp@sathicehat.org
Website : www.sathicehat.org, www.cbmpmaharashtra.org

**छपाई-** एन.आर. एंटरप्रायझेस, पुणे **जानेवारी २०२१**